महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ
सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ दा.नौ. मार्ग, मुंबई- 400 001 . दुरध्वनी क्र. 022-22620304
Website: www.msbae.org.in Email: director.msbae@gmail.com

क्रमांक - मराकशिमं/शुल्क निश्चितीबाबत/२०२४/ 257 दिनांक:- २१.०८.२०२४

परिपत्रक

प्रति,

प्राचार्य,

विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला परिसंस्था

**विषय :- कला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता शुल्क निश्चित करण्यासाठी संगणक प्रणालीद्वारे प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**संदर्भ:-** १. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे क्र. मराकशिमं/शुल्क निश्चितीबाबत/२०२४/१९१ दि. ०७.०८.२०२४ रोजीचे परिपत्रक.

२. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या नियामक परिषदेची दि. १३.०८.२०२४ रोजीची बैठक.

संदर्भ क्र. १ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला परिसंस्थामधील पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित करण्यासाठी संगणक प्रणालीद्वारे दि. २६.०८.२०२४ पर्यत प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या नियामक परिषदेची बैठक दि. १३.०८.२०२४ रोजी पार पडली. सदर बैठकीमध्ये शुल्क निश्चितीसाठीचे प्रक्रिया शुल्काबाबत चर्चा झाली असता, नियामक परिषदेने शुल्क निश्चितीसाठीचे प्रक्रिया शुल्क कमी केले असून ते खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कालावधी (वर्ष) | प्रक्रिया शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| १ | मुलभूत | १ | २५००/- |
| २ | कला शिक्षक प्रशिक्षण (ओ.टी.डी.) | २ | ३५००/- |
| ३ | रेखा व रंगकला | ४ | ७५००/- |
| ४ | उपयोजित कला | ४ | ७५००/- |
| ५ | शिल्पकला व प्रतिमानबंध | ४ | ७५००/- |
| ६ | अंतर्गत गृहसजावट | २ | ३५००/- |
| ७ | वस्त्रकाम (टेक्सटाईल प्रिंटिंग) | २ | ३५००/- |
| ८ | वस्त्रकाम (टेक्सटाईल व्हिविंग) | २ | ३५००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | मातकाम (सिरॅमिक व पॉटरी) | २ | ३५००/- |
| १० | धातुकाम (मेटल वर्क) | २ | ३५००/- |
| ११ | कला शिक्षणशास्त्र पदविका (डिप.ए.एड) | १ | २५००/- |
| १२ | आर्ट मास्टर (On Vacation)/अंशकालिन) | १ | २५००/- |

कला परिसंस्थेमधील विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित अभ्यासक्रमांचे शुल्क निश्चित करण्यासाठी दि. ३१.०८.२०२४ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या www.msbae.org.in या संकेतस्थळावरून Admission मेन्यू मधून https://sss.msbae.in/ay2425/ या लिंकद्वारे प्रस्ताव सादर करावेत. वरील प्रमाणे प्रक्रिया शुल्क Payment Gateway द्वारे स्विकारण्यात येईल. ऑनलाईन प्रस्ताव सादर केल्यानंतर अर्जाची प्रिंट व त्यासंबंधीचे कागदपत्रे सही व शिक्कयासह घेऊन तपासणीकरीता खाली नमूद केलेल्या कालावधीत विभागनिहाय सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई या कार्यालयात उपस्थित रहावे.

ऑनलाईन प्रस्ताव सादर केल्यानंतर अर्जाची प्रिंट व त्यासंबंधीचे कागदपत्रे सही व शिक्कयासह घेऊन दि. ०३.०९.२०२४ ते ०६.०९.२०२४ या कालावधीत खालील वेळापत्रकाप्रमाणे तपासणी करण्याकरीत सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयात उपस्थित रहावे.

| विभाग | जिल्हा | दिनांक |
|---|---|---|
| मुंबई | कोल्हापूर, मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, ठाणे व पालघर. | ०३.०९.२०२४ ते ०४.०९.२०२४ |
| नागपूर | अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, वाशीम, नागपूर, वर्धा, यवतमाळ व गोंदिया | ०५.०९.२०२४ |
| छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, बीड, धुळे, जळगाव, जालना, लातूर, नांदेड, हिंगोली, नाशिक, धाराशिव, नंदुरबार व परभणी. | ०६.०९.२०२४ |

नियामक परिषदेच्या निर्देशानुसार, ज्या संस्था विहित प्रक्रिया शुल्क भरणार नाहीत तसेच विहित मुदतीत शुल्क निश्चितीसाठीचा प्रस्ताव सादर करणार नाहीत, त्या संस्थेच्या अभ्यासक्रमाचे शुल्क शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता निश्चित करण्यात येणार नाही, याची नोंद संस्थांनी घ्यावी.

(राजीव मिश्रा)
कला संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा
सदस्य सचिव, शुल्क निश्चिती समिती

प्रत :-

१. उपसचिव (कला) ,महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ मुंबई, नागपूर व छत्रपती संभाजीनगर.
२. निवड नस्ती.